

शैक्षणिक संदर्भ अंक १२२ फेब्रुवारी - मार्च २०२०



# उल्कापिंड

## भाग १

लेखक : जॉन विंडहम        अनुवाद : यशश्री पुणेकर



# उल्कापिंड

## भाग १

**लेखक : जॉन विंडहम** **अनुवाद : यशश्री पुणेकर**

पूर्ण घर हलत होतं, कपाटातला फोटो खाली पडला आणि त्याच्या काचांचा खच सगळीकडे पसरला. घराच्या जवळच काहीतरी फुटलं होतं आणि त्याचा जबरदस्त मोठ्ठा धडाम असा आवाज आला होता. सॅली फॉटेन खिडकीजवळ गेली आणि पडदा बाजूला करून बाहेर अंधारात बघण्याचा प्रयत्न करू लागली.

“मला काहीच दिसत नाहीये”. “अशा आवाजांमुळे मला युद्धाची आठवण होते,” ग्राहम, सॅलीचा प्रियकर म्हणाला. “तुला काय वाटतं, पुन्हा नवीन युद्ध सुरु होईल का?”

तो असं म्हणतच होता तेवढ्यात दार उघडून सॅलीचे बाबा आत डोकावले, “तुम्ही तो आवाज ऐकलात ना? मला वाटतं एखादा उल्कापिंड पडला असेल. बागेच्या पलीकडे त्या शेतात मी एक धूसर प्रकाश बघितला. चला बघूया”.

त्यांनी कोट घातले आणि विजेरी घेऊन ते बाहेर पडले.


ती वस्तू शेताच्या मधोमध पडली होती. जोरात आपटल्यामुळे तिथे जवळजवळ दोन मीटर रुंदीचा खड्डा पडला होता. त्यांनी त्या खड्डयाजवळ जाऊन पाहिलं पण घसरलेल्या मातीशिवाय काही दिसलं नाही. सॅलीची  पाळलेली कुत्री, मिटी त्या मातीत नाक खुपसून वास घेऊ लागली.  ‘‘मला खात्री आहे की हा छोटासा उल्कापिंडच आहे आणि तो जमिनीत रुतला आहे.’’ सॅलीचे बाबा म्हणाले. ‘‘उद्या काही जणांना बोलावून माती खोदून घेऊ.’’

**$$$**

**ऑनच्या डायरी मधून**

*माझ्या या प्रवासाबद्दल सांगायचं तर महान नेता कॉटॅफ्ट यांच्या भाषणाचा उल्लेख करणं अनिवार्य आहे. ज्या दिवशी आम्ही फोर्टा सोडणार होतो त्याच्या आदल्या दिवशी त्यांनी सगळ्यांना एकत्र बोलावून सांगितलं, ‘‘उद्या सगळे गोलक प्रवासाला निघतील. उद्या फोर्टाचे विज्ञान आणि कौशल्य निसर्गावर विजय मिळवेल. फोर्टामध्ये आपल्या आधीही काही प्रजाती राहात होत्या पण त्या निसर्गावर नियंत्रण मिळवू शकल्या नाहीत आणि यामुळेच जेव्हा जेव्हा मोठे नैसर्गिक बदल झाले तेव्हा त्या जिवंत राहू शकल्या नाहीत आणि नामशेष झाल्या. आपण एकामागून एक अनेक समस्यांचा सामना केला आहे आणि आता पहिल्यापेक्षा जास्त ताकदवान झालो आहोत. आता आपल्याला आत्तापर्यंतच्या सर्वात जटील समस्येवर उपाय शोधायचा आहे. आपलं हे जग, फोर्टा, आता म्हातारं झालं आहे आणि मरणप्राय अवस्थेत आहे. त्याचा अंत आता जवळ आलाय. म्हणूनच आपण निरोगी आणि बलवान आहोत तोवरच इथून बाहेर पडणं आवश्यक आहे. एक नवीन जागा शोधूया म्हणजे आपली प्रजाती जिवंत राहू शकेल आणि टिकेल.’’*

*"उद्या गोलक नवीन जागा शोधायला आसमंतात सर्व दिशांना बाहेर पडतील. तुमच्यापैकी प्रत्येकाकडे फोर्टाचा पूर्ण इतिहास, कला, विज्ञानाचं ज्ञान आणि कौशल्य आहे. या ज्ञानाचा वापर करून दुसऱ्याला मदत करा. झालंच तर त्यांच्याकडून शिका आणि फोर्टाचं ज्ञान समृद्ध करा. जर तुम्ही तुमच्या ज्ञानाचा उपयोग केला नाही, त्यात वाढ केली नाही तर आपल्या प्रजातीचं भविष्य नष्ट होईल. आणि जर आपण या पूर्ण ब्रह्मांडाचे एकमेव बुद्धिमान जीव असू तर आपल्यावर फक्त आपल्या प्रजातीचीच नाही तर ब्रह्मांडात आकार घेऊ पाहणाऱ्या सर्व बुद्धीमान जीवांची जबाबदारी आहे. तेव्हा आता निघा ब्रह्मांडाच्या सफरीला. जा, बुद्धीचा वापर करा. सगळ्यांशी दयाळूपणे वागा आणि सत्याचा मार्ग धरा. शांत मनाने जा. आमचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत."*



*या भेटीनंतर मी आम्हाला ज्या ग्रहावर पाठवणार होते तो ग्रह टेलिस्कोपमधून पुन्हा एकदा बघितला. हा ग्रह फार तरुण नाही पण फार वृद्धही नाही. हा निळ्या मोत्यासारखा चमकणारा ग्रह आहे कारण याच्यावर पाण्याचे प्रमाण अधिक आहे. या ग्रहावर मला पाठवतायत याचा मला फार आनंद वाटला. इतर गोलक जिकडे जाणार आहेत त्या जागा काही विशेष चांगल्या वाटल्या नाहीत.*

*मी पूर्णपणे आशावादी आहे. मला आता कोणतीच भीती वाटत नाही. मी उद्या गोलकात गेलो की वायूच्या प्रभावाने झोपून जाईन. आणि माझे डोळे उघडतील तेव्हा मी एका नव्या झगमगत्या जगात असेन. जर मी उठलो नाही तर निश्चितच काहीतरी गडबड झाली असणार पण मला ते कधीच समजणार नाही.*

*संध्याकाळी खाली जाऊन मी सर्व गोलक शेवटचे बघून घेतले. खरंच किती अद्भुत आहे हे! आमच्या शास्त्रज्ञांनी अशक्यप्राय गोष्टी शक्य करून दाखवल्या. यांच्याइतक्या मोठ्या वस्तू आजपर्यंत झाल्याच नव्हत्या. हे इतके जड आहेत की साधेसुधे असते तर अंतराळात उडण्याऐवजी हे फोर्टाच्या वातावरणातच अडकून राहिले असते. आम्ही धातूचे हे तीस डोंगर उभे केलेत! विश्वासच बसत नाही. पण हेच वास्तव आहे आणि हे सगळे उद्यासाठी सज्ज आहेत. यातील काही त्यांच्या निर्धारित जागेवर पोचणार पण नाहीत...*

*हे प्रभू, आमचा गोलक वाचला तर आमच्या समोर येणाऱ्या सगळ्या आव्हानांना आम्ही तोंड देऊ आणि आमच्यावर टाकलेला विश्वास खरा करून दाखवू. कदाचित हे माझे अखेरचे शब्द असतील, आणि जर मी पुन्हा लिहू शकलो तर ते एका नव्या जगात, एका नव्या आकाशाखाली असेल.*

**$$$**

"तो आउटहाऊसमध्ये आहे." सॅलीने उल्कापिंड बघायला आलेल्या पोलीस इन्स्पेक्टरला सांगितलं, "तो जमिनीत काही फार खोल गेला नव्हता, म्हणून आमच्या माणसांना तो सहज बाहेर काढता आला. आणि वाटलं होतं तेवढा गरम पण नव्हता म्हणून उचलून आउटहाऊसमध्ये आणता आला." सॅली इन्स्पेक्टरला बागेतून विटांनी बांधलेल्या आउटहाऊसकडे घेऊन गेली. पाठोपाठ तिचे बाबा आणि ग्राहम पण गेले. आउटहाऊसची फरशी लाकडी फळ्यांची होती. उल्कापिंड मध्यभागी ठेवला होता. त्याचा व्यास एक मीटर पेक्षाही कमी होता. आणि तो धातूच्या एखाद्या सामान्य चेंडूसारखा दिसत होता. "मी युद्ध कार्यालयाला कळवलं आहे," इन्स्पेक्टर म्हणाला. "तुम्ही याला हात लावायला नको

होतं.  आणि आता जोपर्यंत युद्ध कार्यालय याची तपासणी करत नाही तोवर याला स्पर्श करू नका. तुम्ही म्हणताय की हा उल्कापिंड आहे पण हे एखादं रहस्यमय हत्यारही असू शकेल.” इन्स्पेक्टर असं बोलून वळला आणि ते सगळे बागेकडे परत निघाले.

इतक्यात दारापाशी इन्स्पेक्टर  अचानक थांबला. “हा फुरफुरण्याचा आवाज कुठून येतोय?” ते सगळे अगदी शांत होऊन ऐकू लागले. आता त्यांनाही फुरफुरण्याचा अतिशय हळू आवाज ऐकू येऊ लागला. हा आवाज नक्की कुठून येतोय हे समजणं जरा कठीणच होतं. मग ते सगळे उल्कापिंडाकडे बघू लागले. ग्राहम त्या धातुच्या चेंडूपाशी गेला आणि वाकून त्याने उजवा कान चेंडूला लावला. “हो,” तो म्हणाला. “इथूनच आवाज येतोय.” मग अचानक त्याने डोळे मिटले आणि तो खाली पडला. सगळे त्याच्याकडे धावले आणि त्याला ओढून आउटहाउसच्या बाहेर घेऊन आले. ताजी हवा मिळाल्यावर लगेचच त्याने डोळे उघडले. “काय झालं?”  त्याने विचारलं. तो ठीक आहे हे पाहून सर्वांना बरं वाटलं. “तुला खात्री आहे का की आवाज त्याच्यातूनच येतोय?” इन्स्पेक्टरने विचारलं. “हो, नक्कीच. शंकाच नाही.” सॅलीच्या आधाराने उठत ग्राहम म्हणाला. “तुला कुठला विचित्र वास पण आला का?” इन्स्पेक्टरने विचारलं. “तुम्हाला एखाद्या वायूचा म्हणायचंय का? नाही, मला नाही वाटत वायू असेल,” ग्राहम म्हणाला.

“हं...” इन्स्पेक्टरने विचारले, “उल्कापिंडातून असा फुरफुरण्याचा आवाज येतो का मि. फॉटेन?” “मला नाही वाटत.” “मलाही नाही,” इन्स्पेक्टर म्हणाला. “पण मला हे मात्र वाटतंय की कोणी तज्ञ माणूस येऊन हे बघेपर्यंत आपण सगळ्यांनी दक्ष राहिलं पाहिजे.”

$$$

**ऑनच्या डायरीतून**

*माझे डोळे आत्ताच उघडलेत. आम्ही उडतो आहोत का? का अजून उडायला सुरुवातच नाही केली? मला महिती नाही. आत्ता तासाभरापूर्वी तर आम्ही गोलकात आलो ना? का एक दिवस झाला, का एक वर्ष, का एक शतक? एका तासाभरापूर्वी नसेल कारण मी खूप थकलोय, माझं अंग ठणकतंय.*

*पण थोड्याच वेळापूर्वीचीच गोष्ट असेल, आम्ही लांब रस्त्यावरून गोलकात आलो. प्रत्येकजण आपापला कक्ष शोधून त्यात जाऊन बसला. मी तर कक्षात स्वतःला जखडूनच घेतलं. कक्षाचं प्लास्टिकचं दार हवा भरल्यामुळे फुगलं आणि मला येऊन चिकटलं. मला कुठूनही धक्का बसू नये म्हणून ही व्यवस्था. मी वाट बघत झोपलो. एका क्षणी मी तिथे ताजातवाना आणि भरपूर ताकदवान होऊन झोपलो होतो आणि या एका क्षणाला मी इथे थकून दुखऱ्या अंगाने पडून राहिलो आहे.*

*आमचा प्रवास नक्कीच संपला असणार. मशीनमधून झोपेच्या वायूऐवजी ताजी हवा सोडायला सुरुवात झालीये. नक्कीच आम्ही त्या सुंदर आणि झगमगणाऱ्या निळ्या ग्रहावर आलो असू. नव्या अंतराळात फोर्टा लांब कुठेतरी एक छोटासा प्रकाश म्हणून उरलं असेल. मला खूप उत्साही वाटू लागलं.*

*आत्तापर्यंत माझं आयुष्य एका मरणाऱ्या ग्रहावर गेलं होतं. पण आता माझ्यासाठी एक नवी दुनिया, नव्या भविष्याची दारं उघडणार होती.*

*मला आमच्या मशीनचा आवाज ऐकू येत होता. या प्रवासाला येताना जो लांब रस्ता बंद केला होता तो आता उघडत असेल.*

*इथे आम्हाला काय सापडेल हे सांगता येत नाही. हे जग कसंही असलं तरी आम्हाला धैर्य आणि विश्वास कायम ठेवला पाहिजे. आमच्यापैकी प्रत्येकाकडे दहा लाख वर्षाचं ज्ञान आणि इतिहास आहे, ते सारं सुरक्षित ठेवलं पाहिजे.*

*हा ग्रह तर बराच तरुण आहे आणि इथे आम्हाला बुद्धिवान जीव भेटले तर ते त्यांच्या प्रारंभिक अवस्थेत असतील. त्यांना शोधून त्यांच्याशी मैत्री करायला हवी. कदाचित ते आमच्यापेक्षा वेगळे असतील. पण आम्हाला हे लक्षात ठेवलं पाहिजे की आम्ही 'त्यांच्या' ग्रहावर आलो आहोत. त्यांचं नुकसान करणं दुष्टपणा ठरेल.*

*जर आम्हाला असे कोणी जीव भेटले तर आम्हाला जे येतंय ते त्यांना शिकवणं हे आमचं कर्तव्यच आहे. त्यांना जे माहिती आहे ते त्यांच्याकडून शिकून, एकत्र मिळून काम करू. कदाचित एक दिवस आम्ही फोर्टपेक्षाही जास्त सभ्य जग बनवू शकू.*

**$$$**

"आणि हे काय आहे, सार्जंट ब्राउन?" इन्स्पेक्टरने विचारलं. "ही मांजर आहे, सर," सार्जंट ब्राउन म्हणाला. "हे मलाही दिसतंय," इन्स्पेक्टर म्हणाला. "मी हे विचारतोय की तू मांजरीला काय करतोयस?" "मला वाटतं युद्ध कार्यालयाच्या लोकांना हिची तपासणी करावी लागेल." सार्जंट म्हणाला. "तुला खरंच असं वाटतंय की युद्ध कार्यालयाच्या लोकांना या मेलेल्या मांजरीमध्ये काही रस असेल?" इन्स्पेक्टर. तेव्हा सार्जंटने म्हणणं स्पष्ट केलं, "मी उल्कापिंडाची तपासणी करायला आउटहाऊसमध्ये गेलो होतो. मी कमरेला एक दोरी बांधली होती म्हणजे आत कुठला वायू असेल तर बाहेरची माणसं मला दरवाजातून ओढून काढू शकतील. मी रांगत रांगत त्या चेंडूपर्यंत पोचलो पण तिथे कोणताही वायू शिल्लक

नव्हता. मी चेंडूला कान लावला तर फुरफुरण्याचा आवाजही बंद झालेला होता. पण आता दुसराच आवाज येत होता... हळूहळू घोंघावल्याचा आवाज.''

''घोंघावल्याचा?'' इन्स्पेक्टरने शंकित होऊन प्रश्न विचारला, ''नक्की ना? तुला फुरफुरण्याचा म्हणायचंय का?'' ''नाही सर,'' सार्जंट म्हणाला. ''तो आवाज दूर कुठेतरी इलेक्ट्रिक कटिंग मशीन चालू असल्यासारखा येत होता. पण मला या आवाजावरून असं वाटलं की तो चेंडू अजूनही जिवंत आणि सक्रिय आहे. मी सुरक्षेसाठी माझ्या माणसांना बागेतल्या मातीच्या ढिगाऱ्यामागे लपायला सांगितलं. जेवणाच्या सुट्टीत आम्ही आउटहाऊसपाशी एक मांजर बघितली. ती आत कशी आली काय माहिती? खाऊन झाल्यावर मी पुन्हा उल्कापिंडाची पाहणी करायला आउटहाऊसमध्ये गेलो तर ही मांजर मला त्याच्या जवळच पडलेली दिसली.''

''वायूमुळे मेली असेल का ती?'' इन्स्पेक्टरने विचारलं. सार्जंटने नकारार्थी मान हलवत सांगितलं, ''नाही सर, हे जरा विचित्रच वाटतंय. हे बघा काय आहे.'' सार्जंटने मांजरीचं कलेवर जमिनीवर



ठेवलं आणि तिचं डोकं उचलून धरलं. तिच्या हनुवटीखाली छोट्या गोलाच्या आकारात केस जळले होते. आणि जळलेल्या भागाच्या मधोमध एक छोटंसं छिद्र होतं. मग त्याने मांजरीचं डोकं हळूच खाली ठेवलं आणि इन्स्पेक्टरला तिच्या डोक्यावरही तसंच छिद्र आणि गोलाकार दाखवला. मग त्याने खिशातून एक बारीक सरळ तार काढली आणि मांजरीच्या हनुवटी खालच्या छिद्रात घातली. तार तिकडून जाऊन डोक्यावरच्या छिद्रातून बाहेर आली.

“याचा अर्थ तुमच्या लक्षात येतोय का सर?”  सार्जंटने विचारलं. इन्स्पेक्टरने भुवया उंचावल्या. मांजरीच्या अगदी जवळून छोट्या बंदुकीने तिच्यावर कोणीतरी गोळी उडवली होती. पण शरीरातून बाहेर पडणारी गोळी अगदी एकसारखं निशाण आणि केस जळल्याची खूण नाही करणार. म्हणूनच ही दोन छोटी छिद्रं एकच गोळी आत जाऊन बाहेर आलेल्याची नाहीत. असं असेल का, की दोन छोट्या छोट्या गोळ्या एकाच वेळी वरून आणि खालून मारल्या असतील? नाही नाही... काहीतरी काय!

“नाही सार्जंट, मला कळत नाहीए की ही छिद्रं नेमकी कशामुळे पडली आहेत. तुला काही सुचतंय का?” इन्स्पेक्टरने विचारले. “अजिबात नाही, सर.” सार्जंट. “आणि आता त्या चेंडूत काय चाललंय? अजूनही घोंघावल्याचा आवाज येतोय का?” इन्स्पेक्टरने विचारलं. “नाही सर. जेव्हा मला तिथे मांजर आढळली तेव्हा त्यातून कोणताही आवाज येत नव्हता.” इन्स्पेक्टरने उसासा टाकला. “युद्ध कार्यालयाचा तज्ञ लवकर आला पाहिजे.”

*हिंदी शैक्षणिक संदर्भ १२२ मधून साभार.*

*क्रमशः*

**§§§**

---

लेखक: **जॉन विंडहम**, प्रसिद्ध इंग्लिश विज्ञानकथा लेखक.

हिंदी  अनुवाद: **भरत त्रिपाठी**, एकलव्य, भोपाळ समूहात सहभागी.

चित्रे: **सौम्या मेनन**, चित्रकार आणि ॲनिमेशन फिल्मकार.

मराठी अनुवाद: **यशश्री पुणेकर**, संदर्भ गटात सहभागी.

इमेल - yashashreegpunekar@gmail.com